(८) छोट्या पुस्तिका व प्रकाशन निबंध– (१) कालमापन व त्याची साधनें (ले. कै. त्र्यं. गो. ढवळे) काल म्हणजे काय, त्याचें मापन, साधनें, इ. खुलासा.
(२) पाश्चात्य ज्योतिष्यकाचा वैचारिक इतिहास– (ले. कै. त्र्यं. गो. ढवळे) ख्रिस्तपूर्व दीडहजार वर्षांपासूनच्या पाश्चात्य शास्त्रज्ञांच्या कल्पना व बदल याची माहिती.
(३) सूर्याचें अंतरंग– (लेखक : प्रा. दा. गो. ढवळे) सूर्याच्या अंतरंगासंबंधानें माहिती
(४) सूर्यदेवता– (लेखक : प्रा. मो. ल. चंद्रात्रेय) सूर्यासंबंधानें वाङ्मयांतले कांहीं उल्लेख
(५) आर्यांच्या मूळ वसतिस्थनासंबंधीं झालेल्या व्याख्यान मालेंतील मुद्यांचे टांचण
वरील सर्व छोट्या पुस्तिकांची किं. प्रत्येकी रु. ०·१२ न. पैसे

टीप– १. प्रकाशनें व्ही. पी. नें पाठविली जात नाहींत. २. टपाल हशिलासह पुस्तकांची किंमत मनिऑर्डरनें पाठवावी. ३. सर्व प्रकाशनें, शाळा, कॉलेजांना व ग्रंथसंग्रहालयाकरितां उपयुक्त आहेत.

मागणी कार्यवाह, ज्योतिर्विद्या परिसंस्था, ४१० कसबा, पुणें २. या पत्त्यावर करावी.

---

# जागा पाहिजे

वाढत्या व्यापाच्या दृष्टीनें आपल्या संस्थेस कार्यालयाकरितां व ग्रंथसंग्रहालयाकरितां जागेची अत्यंत निकड आहे. जागा फार मोठी नको. नेहमीच्या आकाराच्या १–२ खोल्या अगर सलग ५–६ खण जागा सध्यां पुरे.

सुदैवानें संस्थेच्या सभासद वर्गांत अनेक घरमालक अगर बंगले-वाले आहेत. त्यांनीं संस्थेचे कार्य आपलेंच कार्य समजून विनामूल्य अशी जागा वापरण्यास द्यावी अगर अल्प भाड्यांत तरी द्यावी ही विनंती.

वर वर्णन केलेली अशी जागा कोठें आढळल्यास तावडतोब कार्यवाह यांचे नजरेस आणण्याची कृपा करावी.

---

"ज्ञानस्य निर्मलं नेत्रं ज्योतिष्यकमनुत्तमम्"

# ज्योतिर्विद्या परिसंस्था, पुणें २.

स्थापना १९४४

JYOTIRVIDYA PARISANSTHA POONA2

## सन १९५९–६०  *  वर्ष १६ वें

## वार्षिक-वृत्तांत व समाव्यय (ताळेबंद)

### [ पुढील वर्षाच्या अर्थ-संकल्पासह ]

प्रकाशक

मो. ना. गोखले, B. Sc.

स. ग. काजरेकर, B. Sc.

कार्यवाह

# सभासदांना सभेचें निमंत्रण

१०।८।६० चालू सालची म्हणजे १७ वें वर्षाची निकाय (वार्षिक साधारण) सभा **रविवार दि. २८।८।१९६० रोजीं सायंकाळीं ४॥ वाजतां** कॉमनवेल्थ बिल्डिंग, औद्योगिक संग्रहालयाचे सभागृहांत भरेल व त्यावेळीं पुढील कामकाजांचा विचार होईल. तरी सर्व सभासदांनीं यावेळीं अवश्य उपस्थित रहावें ही विनंती.

## क्रमणिका

[ १ ] दुखवट्याचा ठराव– कै. त्र्यं. गो. ढवळे ( निधन १०–१–६० )

[ २ ] गतसाल ( १९५९–६० ) च्या वार्षिक सभेच्या इतिवृत्तास मान्यता.

[ ३ ] गतवर्षाच्या कामकाजाचें निवेदन. ( वृत्तान्त रुपानें हें निवेदन छापून सभासदांचे पुढें मांडलें आहे. )

[ ४ ] नवीन वर्गणीदार व देणगीदार यांची माहिती.

[ ५ ] गतसालच्या समाव्ययास ( ताळेबंदास ) मान्यता.

[ ६ ] नवीन पदाधिकाऱ्यांची निवड. (१९६०-६१ करितां)

[ ७ ] या वर्षी (१९६०-६१) संस्थेनें हातीं घेण्याचीं कामें व त्यासंबंधानें आलेल्या सूचनांचा विचार.

[ ८ ] सन १९६०-६१ सालच्या अर्थसंकल्पाचा आराखडा.

[ ९ ] आयत्या वेळेचे विषय ( अध्यक्षांच्या परवानगीनें ).

[१०] अभिनंदन व आभार.

पुणें दि. १०-८-१९६०

आपले

**मो. ना. गोखले,**

**स. ग. काजरेकर**

कार्यवाह.

**टीप**—सभासदांना कांहीं प्रश्न विचारावयाचे असतील अगर सूचना करावयाच्या असतील तसेंच प्रशासक मंडळावर निवड करण्याकरतां नांवें सुचवावयाची असतील तर त्यांनीं सभेपूर्वी निदान २ दिवस अगोदर कार्यवाह यांचेकडे तसें लेखी कळवावें.

**सभेस अगत्यपूर्वक उपस्थित रहावें.**

" ज्ञानस्य निर्मलं नेत्रं ज्योतिष्यकमनुत्तमम् "

# ज्योतिर्विद्या परिसंस्था, पुणें

[ स्थापना : श्री गणेशचतुर्थी, शके १८६६ ता. २२-८-१९४४ ]

## सन १९५९–६० चा ( १६ व्या वर्षाचा ) वार्षिक वृत्तांत

प्रिय सदस्य व संस्थेचे हितचिंतक,

दि. ३० जून १९६० ला संपणाऱ्या आपल्या संस्थेच्या १६ व्या वर्षाचा हा वार्षिक वृत्तांत व ताळेबंद आवश्यक त्या पत्रकांसह आपणांपुढें सादर करण्यास आम्हांस आनंद वाटतो. संस्थेनें आपलें १६ वें वर्ष पुरें करून ती आतां १७ वें वर्षात पदार्पण करीत आहे हें पाहून आपणां सर्वांस समाधान वाटेल यांत शंका नाहीं. आपल्यासारख्या विद्वान व गुणिजनांच्या सहकार्यामुळेंच संस्थेचें पाऊल दिवसेंदिवस प्रगतिपथावर पडत आहे. दरवर्षी आपण कांहींनाकांहीं नवीन व आकर्षक उपक्रम हातीं घेऊन ते यशस्वी रीतीनें पार पाडीत असतों हे आपणांस विदीतच आहे. त्याप्रमाणें वृत्तांतवर्षींही ही प्रथा संस्थेनें चालू ठेविली आहे. गतसालच्या एकंदर कार्याचें निवेदन आम्हीं आपणांस या वृत्तान्तद्वारें करीत आहोत.

(१) **संस्थेचे सभासद**– संस्थेच्या पटावर वर्गणीदार अगर अल्प देणगीदार सभासदांची संख्या चालू वर्षी ( म्हणजे दि. १–७–१९६० ला ) एकंदर १७७ आहे पत्रक नं. ४ पहा. विद्यमान सभासदांनीं संस्थेला नवीन वर्गणीदार, आजीव सभासद व देणगीदार मिळवून देणें अगत्याचें आहे. ही संस्था जितकी जास्त वाढत जाईल त्या प्रमाणांत संस्थेचें कार्य प्रगत होणारे आहे.

**(२) प्रशासक मंडळ** ( Governing Council ) संस्थेचा सर्व कारभार व देखरेख हें मंडळ पाहते. नियमाप्रमाणें गतवर्षीच्या वार्षिक साधारण सभेनें या मंडळावर पुढील पदाधिकाऱ्यांची नियुक्ती केली.

**प्राध्यक्ष–** प्रिन्सी. डी. डी. कपाडिया, M. A. B. Sc. Retd. I. E. S.
**अध्यक्ष–** प्रिन्सिपाल. गो. रा. परांजपे, M. Sc. F. N. I. O. B. E.
**उपाध्यक्ष–** डॉ. मो. बा. चिपळूणकर, M. Sc. D. Sc.
**नैधिक–** प्रा. स. वि. आपटे, M. A. B. Sc. Retd. B. E. S.
**दोन कार्यवाह** १ श्री मो. ना. गोखले, B. Sc.
२ श्री. स. ग. काजरेकर, B. Sc.

**प्रशासक एकंदर ११**

१ प्रा. मो. ल. चंद्रात्रेय, M. A. Retd. B. E. S.
२ डॉ. दि. न. मोघे, M. Sc. D. Sc.
३ श्री. त्र्यं. गो. ढवळे, B. A. (Hons.)
४ श्री. ना. म. आठवले, M. A.
५ प्रा. ज. ब. कुमठेकर, M. A. B. Sc. B. T.
६ श्री. रा. द. बोकील, B. Sc. (Hons.) M. S. (U. S. A.)
७ श्री. शं. ना. हरीप, सेवानि. हेड्क्लार्क
८ प्रा. द. श्री. जोग, M. Sc.
९ श्री. वि. धों. गोरेशास्त्री, संस्कृताध्यापक
१० श्री. द. गो. फडके, B. A. LL. B. सेवानि.
११ श्री. श्री. भा वेदपाठक, B. Sc. B. T.
अधीक्षक (समान्व्य निरीक्षक) श्री. ल. के. तांबे, हेडक्लार्क व अकौंटंट.

वृत्तांत सालीं प्रशासक मंडळाच्या सभा एकंदर ४ झाल्या.

**(३) तद्विद्य मंडळ** ( Academic Council) प्रशासक मंडळानें प्रतिवर्षी आठ जणांचे हें मंडळ निवडावयाचें असतें. या मंडळानें शास्त्रीय विषयांची चर्चा करणें.



५ प्रा. मो. ल. चंद्रात्रेय ६ डॉ. दि. न. मोघे ७ श्री. त्र्यं. गो. ढवळे ८ व श्री. रा. द. बोकील

वृत्तान्त वर्षी या मंडळाच्या सभा एकंदर ३ झाल्या.

**(४) वृत्तांत वर्षांतील कार्य व घडलेल्या घटना—**

**(अ) स्फुट व्याख्यानें–** संस्थेनें जनतेकरतां शास्त्रीय विषयावर एकंदर आठ व्याख्यानें घडवून आणली त्यांचा तपशील असा:–

व्याख्यान १ लें–डॉ. दि. न. मोघे, विषय : रेडिओ स्टार्स दि. २८–११–५९ स्थळ :-कॉमनवेल्थ बिल्डिंग, पुणें.

व्याख्यान २ रें–डॉ. शंकरन, विषय : Speech Structure दि. १९–१२–५९ स्थळ : कॉमनवेल्थ बिल्डिंग, पुणें.

व्याख्यान ३ रें–पं. गोरेशास्त्री, विषय : खगोलीय दृष्ट्या सूर्याचे संक्रमण दि. २३–१२–५९ स्थळ : आयडियल इंग्लिश स्कूल, पुणें.

व्याख्यान ४ थें–श्री. शं. ना. हरीप, विषय : आधुनिक ज्योतिष्यकीय प्रगती दि. ११–१–६० स्थळ : आळंदी देवाची.

व्याख्यान ५ वें–प्रा. डी. एस. जोग, विषय : दोनशे इंची पॅलामोअर दूरादर्श दि. ३१–१–६० स्थळ : कॉमनवेल्थ बिल्डिंग, पुणें.

व्याख्यान ६ वें–श्री. अ. ज. करंदीकर, विषय : वैदिक देवतांचा ज्योतिष्यकीय दृष्ट्या विचार स्थळ : कॉमनवेल्थ बिल्डिंग, पुणें. दि. २६–२–६०

| | | |
|---|---|---|
| ७ वें | सदर | दि. २७–२–६० |
| ८ वें | सदर | दि. २८–२–६० |

**(ब) ग्रंथसंग्रहालयांत भर–** दरसालप्रमाणें यंदाही बेल्जम ऑब्झर व्हेटरीकडून त्यांचे रिपोर्ट्स मासिक-पत्रं व शास्त्रीय प्रकाशनें संस्थेला भेट म्हणून

**(क) देणग्या व आर्थिक निधींत भर—** या सालीं संस्थेला दानशूर व उदार देणगीदारांकडून पुढील देणग्या मिळाल्या.

| | देणगी |
|---|---|
| १ मा. एन. एम. वाडिया चॅरिटीज ट्रस्ट | रु. १००० |
| २ पुणें विश्वविद्यालय [ ग्रंथ छपाईस मदत ] | रु. ६५० |
| ३ मा. सर रतन टाटा ट्रस्ट, मुंबई | रु. ५०० |
| ४ मा. सर दोराब टाटा ट्रस्ट, मुंबई | रु. ५०० |
| ५ पुणें महानगरपालिका | रु. १०० |
| ६ सरकारी ग्रँट ( मा. डायरेक्टर ऑफ एज्यु. मार्फत ) | रु. १७२ * |

* सदरहू ग्रँट अद्याप हातांत पडावयाची आहे

वरील सर्व देणगीदारांचे संस्था हार्दिक आभार मानते.

**(ड) सिनेमा शो** 'THIS ISLAND EARTH' नांवाचा एक ज्योतिष्यकीय (Astronomical) संपूर्ण रंगीत सिनेमास्कोप बोलपट दि. २९-३-६० ला विजय चित्र मंदीर, पुणें येथें ज्योतिर्विद्या परिसंस्थेच्या मदतीकरितां दाखविण्यांत आला. त्याचे दर रु. ३, २, १॥ व १ असे ठेविले होते. खेळ अत्यंत यशस्वी रीतीनें पार पडला व तो प्रेक्षक समुदायास आवडला. शास्त्रीय विषयाशीं निगडित असे बोलपट संस्थेनें आणीत जावेत अशा सूचना प्रेक्षक वर्गाकडून आलेल्या आहेत. खेळाचें उत्पन्न रु. १००१ झाले व या कामीं खर्च रु. २५० आला म्हणजेच या उपक्रमांत खर्चवेच वजा जातां संस्थेला निव्वळ रु. ७५१ नफा झाला. या उपक्रमांत संस्थेचे तरुण उत्साही कार्यकर्ते श्री. श्री. भा. वेदपाठक यांनीं अत्यंत परिश्रम केलें आहेत हे नमूद करण्यास आनंद वाटतो.

**(इ) वेधशाळा व वेधसाधनें प्रकाशन—** सदरहू पुस्तकाच्या छपाईकरितां पुणें विद्यापीठानें रु. ६५० ची देणगी दिली याचा उल्लेख वर आलाच आहे. या कामीं संस्थेचे अध्यक्ष प्रि. गोपाळराव परांजपे यांचे परिश्रम प्रामुख्यानें कारणीभूत आहेत. या पुस्तकाचा प्रकाशन समारंभ येथील नू. म. वि. हायस्कूलच्या प्रशस्त सभागृहांत दि. २१-३-६० ला झाला. अध्यक्षस्थान माननीय डॉ. आप्पासाहेब पवार, डायरेक्टर ऑफ एज्युकेशन यांनीं विभूषित केलें होतें. समयाला उचित अशी प्राध्यक्ष श्री. कपाडिया, प्रिन्सि. परांजपे, श्री. शं. ना. हरीप, श्री. मो. ना. गोखले व समारंभाचे अध्यक्ष डॉ. पवार यांची भाषणें झालीं. प्रा. मो. ल. चंद्रात्रेय यांनीं सर्वांचे आभार मानले.

**(उ) श्री. त्र्यं. गो. ढवळे निधन—** यासालीं आमच्यांतील एक श्रेष्ठ कार्यकर्ते श्री. त्र्यंबकराव ढवळे हे दि. १०-१-६० ला निधन पावले हें नमूद करण्यांस आम्हांस फार खेद होतो. कै. ढवळे हे संस्थेच्या आद्य संस्थापकांपैकीं एक होते. दरवर्षी त प्रशासक मंडळावर व तांत्रिक मंडळावरही निवडून येत असत व त्यांनीं अखेरपर्यंत संस्थेची निरलसपणें सेवा केली ज्योतिष्यकावर त्यांनीं अनेक उपयुक्त व सोपे ग्रंथ लिहिले, व्याख्यानें दिली, व वृत्तपत्रांतून अनेक लेखहीं लिहिले. असा कळकळीचा कार्यकर्ता आपल्यांतून गेल्यानें आपल्या सर्वांचीच हानी झाली आहे.



## वृत्तविशेष

**(५) (अ) संस्थेला सरकारी मान्यता—** शिक्षणाधिकारी डायरेक्टर ऑफ एज्यु. यांचेकडे संस्थेला सरकारी मान्यता मिळावी व सरकारकडून वार्षिक ग्रँटही मिळावी अशाबद्दल अर्ज करण्यांत आले होते व संबंधित अधिकाऱ्यांच्या भेटीगांठीही घेण्यांत आल्या; त्यानंतर डायरेक्टर यांचेकडून योग्य अधिकाऱ्यामार्फत दि. ९-११-१९५९ ला संस्थेच्या कार्यालयाची व कागदपत्रांची तपासणी झाली त्यावेळीं. प्रा. मो. ल. चंद्रात्रेय कै. त्र्यं. गो. ढवळे, प्रा. कुमठेकर, श्री. शं. ना. हरीप व कार्यवाह श्री. मो. ना. गोखले आणि स. ग. काजरेकर यांनीं उपस्थित राहून अधिकाऱ्यांना कागदपत्रें दाखविलीं व लागणारी सर्व माहिती पुरविली. त्यानंतर मा. डायरेक्टर ऑफ एज्यु. यांचेकडून त्यांच्या ता. १०-३-६० च्या जा. नं. S. 67 C 51 A च्या पत्राप्रमाणें कळविण्यांत आलें कीं "तुमच्या संस्थेला Research & Cultural Institution म्हणून प्रथमतः पहिल्या तीन वर्षांकरितां सरकारी मान्यता देण्यांत आली आहे व चालू साली अल्प देणगी ( Tokan Grant ) रु. १७२ मंजूर करण्यांत आली आहे"

याप्रमाणें आपली ज्योतिर्विद्या परिसंस्था आतां सरकारमान्य झाली आहे हें कळविण्यांस आनंद वाटतो.

(आ) आपल्या संस्थेच्या प्रशासक मंडळाचे एक उत्साही सदस्य श्री. रा. द. वोकील, एम्. एस्सी. एम्. एस्. ( U. S. A. ) यांची व्हिज्युअल इन्स्पेक्टर ऑफ एज्युकेशन या जागेवर मुंबई सरकारनें नेमणूक केल्याबद्दल आम्हीं त्यांचें अभिनंदन करतो व त्यांना सुयश चिंतितो. गेल्या वर्षी शिक्षकांकरितां संस्थेनें 'रिफ्रेशर कोर्स' व्याख्यानमाला घडवून आणली त्या संबंधांत व यंदा चित्रपट दाखविला गेला त्या संबंधांत त्यांची आम्हांस अमोल मदत झाली आहे.

(इ) संस्थेचे उपाध्यक्ष डॉ. मो. वा. चिपळूणकर, M. Sc. D. Sc. हे इंटर नॅशनल युनियन ऑफ 'जिओडेसी अॅन्ड जिऑफिजिक्स' या संस्थेच्या परिषदेला पॅरीसला गेले आहेत याबद्दल संस्थेस अभिमान वाटतो.

(६) **चालूं सालीं छापून प्रसिद्ध होणारे ग्रंथ प्रकाशन–** टिळक जन्मशताब्दि निमित्त झालेल्या व्याख्यानमालेस आतां ४ वर्षें झाली पण अनेक कारणामुळें व विशेषतः मदतीच्या अभावीं तो ग्रंथ आजवर छापला गेला नाहीं. कांहीं असले तरी यंदा हा ग्रंथ छापून काढावा असें संस्थेनें निश्चयात्मक ठरविलें आहे. मदतीकरितां उदार देणगीदार मिळाल्यास ठीक होईल.

(७) **खुलाशांची पत्रकें–** वृत्तान्तसाल (१९५९–६० चे) आयव्यय पत्रक नं.१ व पत्रक नं २, अर्थसंकल्प आराखडा साल १९६०–६१ पत्रक नं. ३ व वर्गणीदार यादी पत्रक नं. ४ या सोबत माहितीकरितां जोडलेली आहेत.

## आभार प्रदर्शन

वरीलप्रमाणें हा १६ व्या वर्षाचा म्हणजे सन १९५९–६० चा अहवाल त्रोटक स्वरुपांत आपलेपुढें ठेविला आहे. यावरून संस्थेची वाढती प्रगती आपले नजरेस येईल. प्रतिवर्षी संस्थेच्या प्रगतीचें हें जें पाऊल पुढें पडत आहे त्याचे मुख्य वाटेकरी संस्थेचे सर्व सभासद व शास्त्रप्रेमी जनताच आहे. या सर्वांचे पुनः एकदां हार्दिक आभार मानून हें निवेदन आम्ही संपवितो.

आपले

**स. वि. आपटे,**
नैधिक

**मो. ना. गोखले**
**स. ग. काजरेकर**
कार्यवाह



# ज्योतिर्विद्या परिसंस्था, पुणें

## १ जुलै १९५९ ते ३० जून १९६० अखेर आयव्यय पत्रक

### पत्रक नं १

| जमा | | | खर्च | |
|---|---|---|---|---|
| वर्गणी | | ५३०–०० | वेतन | १६७–११ |
| देणग्या | | २,७६०––० | संस्था प्रचार, सभा, निदर्शनें, व्याख्यानें इ. | ४३–५४ |
| व्याज [बँकेच्या खात्यावरील ] | | ७२–२४ | छपाई व स्टेशनरी | ३१५–२९ |
| प्रकाशनें | | १६०–६० | किरकोळ खर्च | ५७–८५ |
| सूर्यकुल | ७०–०० | | कमिशन व जाहिरात | ५–०० |
| तारकानगरी | १२–०० | | टपाल | ५४–३२ |
| चंद्रप्रभा | ३५–०० | | ग्रंथसंग्रह | ६२–१८ |
| ताराचित्रकसंच | ४२–०० | | वेधसाधनें व वेधशाळा प्रकाशन | ४५३–६० |
| विश्वाची रचना व उत्क्रांती | ०–७५ | | सिनेमा शो | ४४९–७९ |
| संज्ञावली | ०–२५ | | एकूण | १,६०८–६८ |
| पुस्तिका | ०–६० | | शिल्लक [सालअखेर बँकेत] | ५,४६८–७० |
| एकूण | १६०–६० | | रोख | ३–२० |
| वेधसाधनें व वेधशाळा प्रकाशन | | ५–५० | | |
| सिनेमा शो | | १,२०१–०० | | |
| एकूण | | ४,७२९–३४ | | |
| शिल्लक [सालसुरवात बँकेत] | | २,३०७–७६ | | |
| रोख | | ४३–४८ | | |
| एकूण | | ७,०८०–५८ | एकूण | ७,०८०–५८ |

**स. वि. आपटे**
नैधिक

[ शेरा : पान नं. १० वर पहा ]

**मो. ना. गोखले**
**स. ग. काजरेकर**
कार्यवाह

G. D. APTE & Co.
Chartered Accountants
5/7/3



Phone : 7872
United Western Bank
Building, Laxmi Road,
POONA 2. – 12 July, 1960

(पत्रक नं. २)

## Schedule IX

vide Rule 17 (1)

Registered No. F–44.

Income & Expenditure Account for the year ending 30th June 1960

| Expenditure | Rs. nP. | Income | Rs. nP. |
|---|---|---|---|
| To Expenses in respect of Properties | Nil | By Rent. | Nil. |
| To Establisment Expenses* | 536–72 | By Interest (Realised) | 72–24 |
| * Salary Rs. 167–11<br>Printing „ 315–29<br>Postage „ 54–32<br>Total Rs. 536–72 | | On Securities Rs. 17-50<br>On Bank A/Cs. Rs. 54-74<br>Total Rs. 72-24 | |
| To Amounts written off : | Nil. | By Divident | Nil. |
| To Miscellaneous Expenses | 57–85 | By Donations in cash or kind | 2,010–00 |
| To Depreciation | Nil. | By Subscriptions | 530–00 |
| To Expenditure on objects on the Trust. Educational | 147–77 | By Grants | 750–00 |
| Cost of books Sold Rs. 104–23<br>Lectures „ 43–54<br>Total Rs. 147–77 | | Grant from University for publication of books Rs. 650–00<br>Poona Municipal Corpo. Rs. 100–00<br>Total Rs. 750–00 | |
| To Surplus carried over to Balance Sheet | 3,537–21 | By Income from other sources | 917–31 |
| | | Net collection from Cinema show Rs. 751–21<br>Sale of Books Rs. 166–10<br>Total Rs. 917–31 | |
| Total Rs. | 4,279–55 | Total Rs. | 4,279–55 |

As per our report of even date.

Dated at Poona 15-7-60

S/d. *G. D. Apte & Co.*

Trustees S/d. *M. L. Chandratreya*

Chartered Accountants, Auditors

G. D. APTE & Co.
Chartered Accountants
5/7/3



Phone : 7872
United Western Bank
Building, Laxmi Road,
POONA 2. – 12 July, 1960

(पत्रक नं. २ चालूं)

## Schedule VIII

vide Rule 17 (1)

Name of the Public Trust **Jyotirvidya Parisanstha, Poona**

Balance Sheet as at 30th June, 1960

| Funds & Liabilites | Rs. nP. | Assets | Rs. nP. |
|---|---|---|---|
| Trust Fund or Corpus:<br>As per last B/S. Rs. | 1,983–25 | Immovable Properties | Nil. |
| Other Earmarked Funds | Nil. | **Investment**<br>3½% Treasury Savings Dep. Certificate | 500–00 |
| Loans ( Secured or Unsecured ) | Nil. | **Library Books :** | 183–54 |
| Liabilities.<br>For Aryabhushan Press | 270–40 | As per last B/S. Rs. 121–36<br>Additions during the year Rs. 62–18<br>Total Rs. 183–54 | |
| Income Outstanding ( as per Contra ) | Nil. | **Furniture & Fixtures:**<br>As per last B/S. | 191–34 |
| Income & Expenditare A/C. | 6,832–28 | **Loans** | Nil. |
| As per last B/s. 3,295–07<br>Add : Surplus. as per I/E.A/C. 3,537–21<br>Total 6,832–28 | | **Advances :**<br>To stock of publications (Books) | 2,739–15 |
| | | **Income Outstanding :** | Nil. |
| | | **Cash and Bank Balance:**<br>Cosmos Co-op. Bank Ltd., in S/B. A/C. | 5,468–70 |
| | | With Secretary Shri. S. N. Hareep | 3–20 |
| | | Income and Expenditure Account | Nil. |
| Total Rs. | 9,085–93 | Total Rs. | 9,085–93 |

The above Balance Sheet to the best of my/our belif contains a true account of the Funds and Liabilities and of the Property and Assets of the Trust.

As per our report of even date.

Dated at Poona 15-7-60

S/d. *G. D. Apte & Co.*

Trustees S/d. *M. L. Chandratreya*

Chartered Accountants, Auditors

# पत्रक नं. १ व २ वरील हिशेबनिसांचे शेरे

## शेरा ( मराठी ) संस्थेचे अधीक्षक यांचा –

ज्योतिर्विद्या परिसंस्थेचा सन १९५९–६० चा सर्व जमाखर्च, जमेच्या पावत्या, खर्चाची व्हौचर्स, खतावणी, कॉसमॉस बँक लि. वरील संस्थेचे सेव्हिंग्ज अकौंट बुक [ खाते नं. १६४२ ] जावक टपाल बही यावरून तपासून पाहिला आहे. तसेंच सन १९५९–६० ची रोजकीर्द खतावणी व तदनुषंगिक इतर नोंदणीबुकेंही तपासलीं आहेत. सर्व जमाखर्चाचें काम व रेकॉर्डमधील नोंदण्या बरोबर केलेल्या असून त्यांत कोणतीही चूक आढळली नाहीं. जमाखर्चाचे काम काळजीपूर्वक, व्यवस्थित व नियमांस अनुसरून केलेलें आहे.

पुणें, दि. ४ जुलै १९६०

**लक्ष्मण केशव तांबे**
अधीक्षक
[ संस्थेचे अधिकृत हिशेब तपासनीस ]

## शेरा ( इंग्रजीमध्यें ) मेसर्स जी. डी. आपटे ॲण्ड कं. यांचा –

संस्थेचे हिशेब तपासले, ते योग्य तऱ्हेनें ठेवलेले असून बरोबर आहेत. आम्हांस सर्व पावत्या व इतर दस्तरहि दाखविण्यांत आले. वरील बॅलन्स शीटमध्यें रोख रकमेव्यतिरिक्त मिळालेल्या देणग्यांचा अंतर्भाव केलेला नाहीं.

सही / जी. डी. आपटे आणि कं.
चार्टर्ड अकौंटंट, ऑडिटर्स



# १९६०-६१ सालचे निकल्प (अर्थसंकल्प)

**जमा** ( पत्रक नं. ३ ) **खर्च**

| खातें | मागील वर्षाचीं प्रत्यक्ष रु. न.पै. | १९६०-६१ ची संकलिपत रु. न.पै. | खातें | मागील वर्षाची प्रत्यक्ष रु. न.पै. | १९६०-६१ ची संकलिपत रु. न.पै |
|---|---|---|---|---|---|
| वर्गणी | ५३०–०० | ६००–०० | जागा भाडें | | ६००–०० |
| देणग्या | २,७६०–०० | ३००–०० | फर्नीचर | | १००–०० |
| व्याज | ७२–२४ | ७५–०० | वेतन | १६७–११ | १८०–०० |
| प्रकाशन विक्री | १६६–१० | २००–०० | संस्था प्रचार | | |
| तूट | | ५,७४५–०० | सभा व्यख्यानें इत्यादि | ४३–५४ | ६०–०० |
| | | | छपाई व स्टेशनरी | ३१५–२९ | २५०–०० |
| | | | किरकोळ | ५७–८५ | ६०–०० |
| | | | कमिशन | | |
| | | | जाहिरात | ५–०० | ५०–०० |
| | | | टपाल | ५४–३२ | ६०–०० |
| | | | ग्रंथ संग्रह | ६२–१८ | ६०–०० |
| | | | *प्रकाशन छपाई | ४५३–६० | २,५००–०० |
| | | | साहित्य संभार उपकरणें इ. | | ३,०००–०० |
| | | | थिओडोलाईट १,५०० | | |
| | | | एपिडियास्कोप व फिल्म प्रोजेक्टर | | |
| | एकूण रु. | ६,९२०–०० | रु. १५०० | एकूण रु. | ६,९२०–०० |

* निकल्प तुटीचें झालें आहे. यांत प्रकाशनाचें रु. २,५००/– व साहित्य संभार खरेदी यांसाठीं रु. ३,०००/– असें एकूण रु. ५,५००/– सरकारकडून अपेक्षित मदत मिळाल्यासच खर्च करतां येतील.

**स. वि. आपटे**
नैधिक

**मो. ना. गोखले**
**स. ग. काजरेकर**
कार्यवाह

# सभासदांच्या पटावर असलेल्या वर्गणीदार किंवा अल्प देणगीदारांची नांवे

## पत्रक नं. ४

### आजीव सभासद एकंदर ३२ —

१ कै. प्रिन्सि. के. रा. कानिटकर M. A. B. Sc.
२ प्रा. डी. डी कपाडिया M. A., B. Sc., Retd. I. E. S.
३ प्रा. मो. ल. चंद्रात्रेय M. A., Retd. B. E. S.
४ प्रा. स. वी. आपटे M. A., B. Sc., Retd. B. E. S.
५ बॅरिस्टर डी. जी. काळे B. A., M. Sc. Bar-at-Law
६ श्री. डी. बी. बागडे D. C. E. Engi.
७ श्री. कुमार आनकचंद्र, सरदार
८ कै. शेठ अमृतलाल दलपतभाई, एडिटर
९ रा. ब. न. स. जोशी B. E.. M. I. E.
१० प्रिन्सि. जे. आर. घारपुरे B. A., LL. B.
११ कै. डॉ. बाबासाहेब जयकर P. C., M. A., LL. D.
१२ श्री. ग्यानोबा पांडुरंग कुंभारे फ्लॉबर मर्चंट
१३ श्रीमंत सरदार गंगाधरराव तथा आबासाहेब मुजुमदार, पुणें
१४ ज्योतिर्विभूषण हरिकृष्णशास्त्री याज्ञिक एडिटर
१५ कै. प्रा. एस. जी. साठे M. A., S. E. S.
१६ श्री. का. म. महाजन, ॲडव्होकेट
१७ रा. सा. डी. टी. महाजन इले. इंजिनियर
१८ श्री. शं. तु. दुधाट D. A., C. M. A.
१९ श्री. मो. भा. गांधी D. A., C. M. A.
२० श्री. द. भ. लोखंडे, प्रतिभा प्रेस
२१ श्री. दे. श्री. जोशी, प्रतिभा प्रेस
२२ न्यायमूर्ती शं. बा. ढवळे I. C. S.
२३ कै. चंद्रशेखर गोविंद आगाशे
२४ श्री. त्र्यंबकराव वैकर सराफ अहमदनगर
२५ श्री. र. बा. आपटे, मिल ओनर, मुंबई
२६ श्री. आर. एस. देशपांडे B. E., M. I. E.
२७ श्री. भा. दि. गरवारे, मुंबई
२८ आचार्य स. ज. भागवत, कुलगुरु
२९ श्री. आर. के. प्रभू, B. A. एडिटर
३० डॉ. ना. भि. परुळेकर M. A., Ph. D.
३१ श्री. वि. कृ. नगरकर B. A. मुंबई
३२ श्री. नागेश केशव जोग B. A पुणें



### इतर सभासद :

**A**

१ श्री. अलूरकर बळवंत हणमंत
२ ,, अभ्यंकर त्र्यंबक बळवंत B. A.
३ डॉ. आपटे मल्हार विनायक B. Sc., M. B. B. S.
४ श्री. आठल्ये गणेश महादेव, शिक्षक
५ ,, आगटे रामकृष्ण पांडुरंग B. A., B. T.
६ प्रा. आठवले नारायण महादेव M. A.
७ श्री. आठवले जे. एन. B. E., M. Sc
८ डॉ. सौ. आपटे मधुमालती M. A., Ph. D.
९ डॉ. आपटे अच्युत शंकर M. A., Ph. D.
१० श्री. ओक अरविंद नरहर B. Sc., B. T.
११ ,, ओगले जी. के. B. B.
१२ ,, ओंकार मो. चिं. B. A.

**B**

१३ श्री. बावडेकर वासुदेव गणेश, शिक्षक
१४ ,, बर्वे वासुदेव रघुनाथ M. A. B. Sc.
१५ श्री. बोकील राजाराम दत्तात्रय M. S. ( U. S. A. )
१६ ,, बर्वे शंकर गोपाळ I. A.-S. T. C.
१७ ,, भट विश्वनाथ कृष्ण B. Sc., B. T.
१८ ,, बेलवलकर र. ना. M. Sc.
१९ ,, बोरकर रा. य. L. S. G. D.
२० ,, भोंडे नारायण विनायक B. A., LL. B.
२१ ,, बंबावाले त्र्यंबक अमृत B. A.
२२ ,, भगली श्रीपाद बापूराव B. Sc.
२३ कु. भोपटकर सुंदराताई, कार्पोरेटर

**C**

२४ प्रा. चौबळ पी. एम. B. A. (Hons.)
२५ श्री. चांदोरकर शामराव रामचंद्र M. Sc.
२६ डॉ. चिपळूणकर मो. वा. M. Sc., D. Sc.
२७ श्री. चिले गोविंद काशिनाथ B. A., LL. B.

**D**

२८ श्री. ढवळे प्रभाकर श्रीधर B. Sc.
२९ ,, द्रवीड शिवराम श्रीधर B. Sc., M. Ed.
३० ,, देशपांडे कृष्णाजी रामचंद्र B. A., B. E.
३१ प्रिन्सि. देशपांडे बी. बी. M. Sc., B. E. मुंबई
३२ श्री. देशपांडे मुरलीधर कृष्ण I. A. S. सेवानि.
३३ श्री. दिवेकर हरी रामचंद्र M. A., D. Lt. ग्वाल्हेर
३४ दीक्षित पांडुरंग दत्तात्रय, M. A. पुणें
३५ श्री. देव सिद्धेश्वर दत्तात्रय B. E. मुंबई
३६ ,, देव पं. नरहर सावळेराम, ज्योतिषी
३७ ,, देडगांवकर गोपाळ शंकर, 'धर्ममनिषि'
३८ ,, देवधर विश्वनाथ नारायण सहसंपादक, केसरी
३९ ,, दामले जी. एस. B. A., LL. B. पुणें
४० ,, दीक्षित प्रभाकर नारायण B. A.

## इतर सभासद ( पुढें चालू )

४१ डॉ. डोळे कृष्णाजी खंडेराव M. Sc., Ph. D.
४२ प्रा. दबडघाव वा. म. M. A. पुणें
४३ श्री. दर्प श्रीधर दत्तात्रय M. A., B. T.
४४ सौ. दर्प मंगलाबाई M. A., B. T.
४५ श्री. ढमढेरे पांडुरंग रामचंद्र M. A.

**G**

४६ श्री. गोरेशास्त्री वि. धों. संस्कृताध्यापक
४७ ,, गोळे वसंत हरी M. A. रजिस्ट्रार, पुणें विद्यापीठ
४८ ,, गोखले दा. वि. B. A., LL. B.
४९ ,, गोखले मोरेश्वर नारायण B. Sc., I. M. D.
५० ,, गोखले निळकंठ नारायण B. Sc. M. Ed.
५१ ,, गोखले नारायण भालचंद्र B. A., B. T.
५२ ,, गर्दे माधव मोरेश्वर M. A.
५३ ,, मेजर गद्रे नारायण बाळकृष्ण B. E., M. I. E.
५४ ,, गद्रे शंकर महादेव
५५ ,, गोडबोले विनायक चिंतामण B. Sc., M. Ed.
५६ ,, गुप्ते दिगंबर दत्तात्रय B. Sc., B. T.
५७ ,, गिरमे कृष्णराव तुकाराम LL. B.
५८ ,, घाणेकर श्रीपाद रघुनाथ L. M. E.

**H**

५९ श्री. हरीप शंकर नारायण Hc. Pub. Heath Eng. Sirvice
६० श्री. होनप वासुदेव रामचंद्र B. A., LL. B.
६१ ,, हिरपाठक शंकरराव रामचंद्र सेवानिवृत्त

**J**

६२ श्री. जोशी गो. म. B. A. (Hons.) समाज शास्त्रज्ञ
६३ सौ. जावडेकर मालिनीबाई M. Sc.
६४ श्री. जोशी विष्णु हरि, सेवानि. अर्कौ.
६५ प्रा. जोशी केशव विष्णु
६६ श्री. जोशी पं. महादेवशास्त्री, लेखक
६७ ,, जोशी काशिनाथ रामचंद्र
६८ प्रा. जोग दत्तात्रय श्रीधर M. Sc.
६९ ,, जवखेडकर दत्तोपंत (होरामार्तंड)

**K**

७० ,, कर्णिक दत्तात्रय आत्माराम B. A. (Hons.) मुंबई
७१ प्रा. कवलगीकर श्री. ना. M. A.
७२ डॉ. करमरकर कृ. र. B. Sc. (Hons.) Ph. D.
७३ श्री. काळे प्रल्हाद भास्कर
७४ वे. शा. सं. श्री. काशीकर चिं. ग.
७५ श्री. काजरेकर स. ग. B. Sc.
७६ ,, कोळी वसंत नारायण, मुंबई
७७ श्री. कंटककर हरी वासुदेव B. E. सेवानि. इंजीनियर
७८ ,, करमरकर वसंत हरि B. Sc.
७९ प्रा. कुलकर्णी ना. रा. M. Sc.
८० श्री. कुलकर्णी व. न. B. A., B. T.



## इतर सभासद ( पुढें चालू )

८१ श्री. कुलकर्णी अरविंद दत्तात्रय
८२ ,, काळे के. नारायण B. A., LL. B. साहित्यीक
८३ ,, कुलकर्णी विनायक विश्वनाथ B. Sc., B. T.
८४ ,, खराडे बी. एस. L. C. E. सेवानि. इंजीनिअर
८५ ,, खरे गजानन विनायक, चित्रकार
८६ ,, खारकर शरश्चंद्र महादेव B. Sc.
८७ ,, केळकर विनायक प्रभाकर
८८ ,, केळकर वासुदेव नरहर M. Sc.
८९ ,, प्रा. कुमठेकर जगन्नाथ बळवंत B. Sc., M. A., B. T.
९० ,, केळकर श्रीधर केशव B. A. (Hons.)
९१ ,, केसकर भालचंद्र चिंतामण B. Sc., M. Ed., D. P. Ed.
९२ प्रा. क्षीरसागर के. पी. M. A., B. Sc.

**L**

९३ श्री. लिमये मोरेश्वर भिकाजी, फोटोग्राफर
९४ आचार्य लिमये विष्णु प्रभाकर, वाङ्मय विशारद
९५ श्री. लिमये दामोदर कृष्णाजी B. E.
९६ प्रा. लिमये पी. एस. M. A.
९७ श्री. लिमये सदाशिव पुरुषोत्तम B. Sc., B. T.
९८ ,, लेले विष्णुपंत गोविंद H. C. सेवानि.

**M**

९९ डॉ. मोघे दि. न. M. Sc., D. Sc.
१०० श्री. मोडक विजय विश्वनाथ G. D. C., G. C. E.
१०१ ,, मोडक विश्वनाथ आबाजी
१०२ प्रा. मंगरूळकर अरविंद गंगाधर M. A.
१०३ श्री. मराठे वामन रामकृष्ण B. A.
१०४ ,, महाजन के. डी. B. Sc., B. E., M. I. E.
१०५ ,, मालेगांवकर यशवंत रामचंद्र B. Sc.

**N**

१०६ श्री. नगरकर पुरुषोत्तम लक्ष्मण L. C. E. सेवानि. इंजि.
१०७ ,, नेऊरगांवकर एस. के. B. E., A. M. I. E.
१०८ ,, नातू एस. व्ही. B. E., B. Sc., M. I. E.
१०९ ,, नेने यशवंत रामचंद्र M. Sc.
११० ,, नाथजोशी द. सि. पंचांगकर्ते

**P**

१११ श्री. पदे जगन्नाथ श्रीधर M. A. (प्राइझमन)
११२ ,, पटवर्धन रघुनाथशास्त्री ज्योतिषाचार्य
११३ ,, पटवर्धन रामकृष्ण पुरुषोत्तम M. A. (Hons.)
११४ प्रा. परांजपे जी. सी. M. Sc.
११५ प्रिन्सि. परांजपे जी. आर. F. N. I., O. B. E., I. E. S. सेवानि.
११६ श्री. परांजपे व्ही. एस. सेवानि. इंजीनि.

१८

## इतर सभासद ( पुढें चालू )

११७ श्री. फडके द्. गो. B. A., LL. B. सेवानि.
११८ ,, फणसळकर रा. ल. B. E., M. I. E.
११९ म. म. पोतदार दत्तो वामन B. A. समाजधुरीण
१२० ,, पन्त मा. भ. B. Sc., B. T.
१२१ ,, पाटणकर यशवंत शंकर B. Sc.
१२२ ,, पुराणीक गणेश दिगंबर अकौं.
१२३ डॉ. पेंडसे सी. जी. M. A., B. Sc., Ph. D.

**R**

१२४ श्री. रबडे शंकरराव B. A., LL. B.
१२५ ,, रणदिवे मुकुंद गोविंद B. Sc.
१२६ ,, रेवणकर मनोहर विष्णु M. Sc.,
१२७ ,, राजे द्वा. ना. ज्योतिषाचार्य
१२८ ,, राव बी. एस. B. Sc.
१२९ डॉ. राजोपाध्ये वि. य. M. Sc., Ph. D.
१३० श्री. रिसबूड बी. के. B. A., B. Sc.

**S**

१३१ ,, सिन्हा कमलाप्रसाद B. Sc.
१३२ श्री. शेटे विश्वनाथ त्र्यंबक B. A., LL. B.
१३३ ,, साने अनंत नारायण B. A., B. T.
१३४ ,, साने जगन्नाथ कृष्ण B. Sc.
१३५ डॉ. संकरन् M. A. Ph. D.
१३६ श्री. सरदेसाई श्रीराम कृष्णाजी
१३७ ,, शिंगरे मध्वराज व्यंकटेश
१३८ ,, साठे वसंत विष्णु B. E.
१३९ ,, साठे महादेवराव वासुदेव H. C. सेवानि.

**T**

१४० श्री. तांबे लक्ष्मण केशव Hc. & Acctt.
१४१ ,, टिळक जगन्नाथ दामोदर

**V**

१४२ ,, वाळिंबे बी. जी. B. Sc., B. E., M. I. E. इंजीनिअर
१४३ ,, वेदपाठक श्रीधर भाऊराव B. Sc., B. T.
१४४ ,, वाघ व्ही. बी. शिक्षक
१४५ ,, वैद्य गंगाधर दत्तात्रय B. A., B. T., S. T. C.

—( महाजन प्रिन्टिंग प्रेस, पुणें २. )—

# ज्योतिर्विद्या परिसंस्थेचीं प्रकाशनें

## उपयुक्त व संग्राह्य

(१) **सूर्यकुल**– ( संग्राहकः प्रा. मो. ल. चंद्रात्रेय व कै. त्र्यं. गो. ढवळे )
सूर्यकुलांमधील निरनिराळे ग्रह व उपग्रह; उल्का, लघुग्रह, धूमकेतु इ. संबंधानें ज्ञानसंवर्धक व अद्ययावत् व उपयुक्त माहिती. सुबोध भाषा व विद्वानांनीं एकमुखानें वाखाणलेलें व डेक्कन व्हर्नाक्युलर सोसायटीनें पारितोषक देऊन गौरविलेलें; पृष्ठ संख्या २८०, किंमत रु. ५.

(२) **तारकानगरी**–तारकांनीं व्यापिलेल्या एकंदर विश्वाविषयीं उद्‌बोधक माहिती तारकादिकांची ओळख, आकाशगंगेचें स्वरूप, दूर अंतरावरच्या ताऱ्यांची माहिती कशी मिळविली जाते, ताऱ्यांच्या गती कशा काढतात, अंतराळांतल्या अनेक विश्वांचें स्वरूप, इ. उपयुक्त व मनोरंजक माहिती. याही प्रकाशनाला डे. व्ह. ट्रान्स्लेशन सोसायटीनें पारितोषक देऊन गौरविलें आहे व विद्वानांनीं प्रशंसिलें आहे. पृष्ठसंख्या १६५ किंमत ३ रु.

( ३ ) **ताराचित्रक संच**– ( आवृत्ती दुसरी, दोन रंगात छपाई ) ठळक ठळक ताऱ्यांची ओळख करून देणारे, आकाशाच्या देखाव्यावरून तारीख व वेळ सांगणारें तसेंच तारीख वेळेवरून आकाशाचें कोणतें दृष्य दिसूं शकेल त्यांचा बोध करणारे दोन मोठे नकाशे. आकारः अनुक्रमें ४०×३० व २७×२२॥ इंच. सोबत खुलासा देणारी विवरण पुस्तिकाही मिळते. सर्व संचाची किंमत १:५० न. पै.

( ४ ) **वेधसाधनें व वेधशाळा**– प्राचीन काळापासून वेध घेण्याचीं साधनें कोणतीं होतीं, त्यांची वाढ व परिणति पुढें कशी झाली, त्यांची रचना, वेधशाळांचे सामान्य स्वरूप व तेथील कार्य व संवइ ( Radio Astronomy ) ची ओळख या ग्रंथांत सुबोध रीतीनें मांडली आहे. किंमत २.७५ न. पै. व पोस्टेज १ रु.

( ५ ) **चंद्रप्रभा**– चंद्राचे वाङ्मयांतील उल्लेख. चंद्रामुळें पंचांग कसें बनतें, चंद्रावर वसाहत करणें कितपत शक्य आहे, चंद्राची ग्रहणें, भरती ओहोटी वगैरे संबंधानें खुलासा व चटकदार वर्णन, डे. व्हर्ना. ट्रान्स्लेशन सोसायटीनें पारितोषक देऊन गौरविलेलें पुस्तक. पृष्ठसंख्या १३० : किंमत रु. २-५० न. पै.

(६) **विश्वाची रचना व उत्क्रांति**– (ले. कै. त्र्यं. गो. ढवळे) सबंध विश्वाची घडण क्रमशः कशी होत गेली, अभिका, दीर्घिका काय आहेत व या विश्वाची उत्क्रांती कशी होत आहे या संबंधीं सोपपत्तिक माहिती. **पृष्ठें ४५ किंमत ७५ न. पैसे**

(७) **संज्ञावली**– ( ज्योतिष्यकाच्या पारिभाषिक शब्दांचे अर्थ व विवरण )
**पृष्ठें : २३, किंमत रु. ०·२५ न. पैसे**